RNI No. MAHBIL/2012/44835
Regn. No. PCE/069/2013-2015
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - ४, अंक - ४३] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २२ - २८, २०१५ / आश्विन ३० ते कार्तिक ६, शके १९३७ [पृष्ठे १०, किंमत : १९.००

प्राधिकृत प्रकाशन

संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

विभागीय आयुक्त यांजकडून

प्रारूप अधिसूचना

क्रमांक मशा/कार्या.-२/जमीन-४/१५३४५/२०१५.– ज्याअर्थी, भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) याच्या कलम २९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून विभागीय आयुक्त, नाशिक यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ३ नोव्हेंबर २००५, भाग एक, नाशिक विभागीय पुरवणी याद्वारे असे घोषित केले होते की, उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार ''संरक्षित वने'' यांच्या तरतुदी जी राखीव वनात अंतर्भूत केलेली नाही. मात्र जी शासनाची मालमत्ता आहे किंवा जिच्यावर शासनाचा स्वामित्वाधिकार आहे किंवा जिचे संपूर्ण वनोपज किंवा त्याचा कोणताही भाग मिळण्यास शासन हक्कदार आहे, अशा यासोबतच्या अनुसूचीमध्ये अधिक विशेषकरून उल्लेखिलेल्या वन जमिनी/पडीक जमिनी (यात यानंतर जिचा ''उक्त जमीन'' असा निर्देश करण्यात आला आहे) या ''संरक्षित वने'' म्हणून लागू असतील;

आणि ज्याअर्थी, भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) याच्या कलम ३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून महाराष्ट्र शासनाने उक्त जमीन ''राखीव वन'' म्हणून स्थापित करण्याचे ठरविलेले आहे;

त्याअर्थी, आता भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) याची कलमे ४ व १७ व २९ याद्वारे तसेच [मुंबई विभाग कमिशनर अधिनियम, १९५७ (१९५८ चा मुंबई ८) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (४) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली] शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक एफएलडी-१०८१/एफ-६, दिनांक २१ ऑक्टोबर १९८१ याद्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, याद्वारे —

(क) असे घोषित करतात की, उक्त अधिनियमाच्या संरक्षित वनाशी संबंधित प्रकरण चारच्या तरतुदी उक्त जमिनीस लागू असण्याचे बंद होईल.

(ख) असे घोषित करतात की, महाराष्ट्र शासनाने उक्त जमीन ''राखीव वने'' म्हणून स्थापित करण्याचे ठरविले आहे;

(ग) यासोबतच्या अनुसूची अनुसार राखीव वनांची स्थिती व हद्दी विनिर्दिष्ट करीत आहेत; आणि

(घ) राखीव वनाच्या हद्दीमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमिनींमध्ये अथवा जमिनींवर किंवा कोणत्याही वनोपजामध्ये अथवा त्यावर असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कथित अधिकारांच्या बाबतीत चौकशी करण्याकरिता आणि त्या अधिकारांचे अस्तित्व, स्वरूप व व्याप्ती निर्धारित करण्याकरिता तसेच उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनमध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्यानुसार कार्यवाही करण्याकरिता वन जमाबंदी अधिकारी म्हणून अकोले तालुक्याचा प्रभारी असलेल्या उपविभागीय अधिकारी, संगमनेर उपविभाग, संगमनेर यांची नियुक्ती करीत आहेत;

(ङ) उक्त अधिनियमांची कलमे ११, १२, १५ व १६ यान्वये वन जमाबंदी अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशावर करण्यात आलेल्या अपिलांवर सुनावणीकरिता जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची नियुक्ती करीत आहेत.

अनुसूची

जिल्हा अहमदनगर, तालुका अकोले, गाव बारी

गट क्रमांक	क्षेत्र	चतु:सीमा			
		उत्तर	पूर्व	दक्षिण	पश्चिम
१	२	३	४	५	६
	हे. आर				
९/१	८० ००	मौजे इंदोरे, तालुका इगतपुरी, व जहागीरदार-वाडीची शीव.	मालकी गट नंबर ७, ८, १५, १६ आणि जहागीरदार-वाडीची शीव.	मौजे पांजरे गावाची शीव.	मौजे इंदोरे, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक व मौजे पांजरे गावाची शीव.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

एकनाथ डवले,
विभागीय आयुक्त,
नाशिक विभाग, नाशिक.

नाशिक, २४ सप्टेंबर २०१५.

Draft Notification

No. RB/Desk-II/Land-4/15345/2015.– Whereas the Commissioner of Nashik has, in exercise of the powers conferred by Section 29 of the Indian Forests Act, 1927 (16 of 1927) *vide* Maharashtra Government Gazette, Part-I, Suppliment dated 3rd November 2005, the Notification, Commissioner of Nashik, declared that the provisions of Chapter IV of Protected Forests of the said Act shall be applicable to the Forest Land / Waste Land which is not included in the Reserved Forest but which is the property of Government, or over which the Government has proprietary rights, or to the whole or any part of the forest produce of which the Government is entitled, more specifically mentioned in the Schedule appended hereto (hereinafter referred to as "the said land") as a "Protected Forest";

and whereas, the Government of Maharashtra has in exercise of the powers conferred by Section 3 of the Indian Forests Act, 1927 (16 of 1927) decided to constitute the said land, to be a "Reserved Forest";

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sections 4, 17 and 29 of the Indian Forests Act, 1927 (16 of 1927) read with the Government Notification, Revenue and Forests Department, No. FLD-1081/F-6, dated the 21st October 1981 [issued in exercise of the powers conferred by sub-section *(4)* of Section 3 of the Bombay Commissioners of Divisions Act, 1957 (Bom.VIII of 1958)] the Commissioner of Nashik hereby–

(a) declares that the provisions of Chapter IV relating to Protected Forest of the said Act shall ceased to apply to the said land;

(b) declares that the Government of Maharashtra has decided to constitute the said land as Reserved Forest;

(c) specifies the situation and limits of Reserved Forests as per the Schedule appended hereto; and

(d) appoints the Sub-Divisional Officer, Sangamner Sub-Division Sangamner, district Ahmednagar in charge of the Akole taluka, to be the Forest Settlement Officer to inquire into and determine the existence, nature and extent of any rights alleged to exist in favour of any person in or over any land comprised within the limits of the Reserved Forest, or in or over any forest produce, and to deal with the same as provided in Chapter II of the said Act;

(e) appoints the Collector, Ahmednagar to hear appeals from any orders passed by the Forest Settlement Officer under Sections 11, 12, 15 and 16 of the said Act.

Schedule

District Ahmednagar, taluka Akole, village Bari

Gat No.	Area	Boundaries			
		North	East	South	West
1	2	3	4	5	6
	H. A.				
9/1	80 00	Boundary of village Indore, taluka Igatpuri, district Nashik and boundary of Jaghgirdarwadi.	Gat Nos. 7, 8, 15, 16 and boundary of Jaghgirdarwadi.	Boundary of village Panjare.	Boundary of village Indore, taluka Igatpuri, district Nashik and boundary of village Panjare.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

EKNATH DAWALE,
Divisional Commissioner,
Nashik Division, Nashik.

Nashik, 24th September 2015.

कार्यकारी अभियंता यांजकडून

गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५

क्रमांक गिपावि/सिंचन/४८७१/२०१५.— महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५) याच्या कलम ३ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे जलसंपदा विभागामार्फत तसेच या विभागांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा देण्याकरिता विहित कालमर्यादेसह पद निर्देशित अधिकारी, प्रथम अपील अधिकारी व द्वितीय प्राधिकारी अधिसूचित करीत आहे.

अनुसूची

अ.क्र.	विषय	सेवा पुरविण्याचा कालावधी	पद निर्देशित अधिकारी	प्रथम अपीलिय अधिकारी	द्वितीय अपीलिय अधिकारी
१	२	३	४	५	६
१	पाणीवापर संस्थेस देय पाणी हक्क मंजुरी देणे.	१५ दिवस (हंगाम सुरू झाल्यानंतर).	१. शाखाधिकारी- पाटशाखा-गिरणा धरण शाखा, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक. २. शाखाधिकारी- पाटशाखा-मेहुणबारे शाखा, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव. ३. शाखाधिकारी- पाटशाखा-कळवाडी शाखा, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक. ४. शाखाधिकारी- पाटशाखा-दहिवद शाखा, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव. ५. शाखाधिकारी-पाटशाखा-टाकळी-१ शाखा, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव. ६. शाखाधिकारी-पाटशाखा-टाकळी-२ शाखा, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव. ७. शाखाधिकारी-पाटशाखा-लघु पाटबंधारे शाखा, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव.	सहायक अभियंता (श्रेणी-१) पाटबंधारे उपविभाग, चाळीसगाव, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव. (अ.क्र. १ ते ७).	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.

अनुसूची — चालू

१	२	३	४	५	६
२	पाणीवापर संस्थेस पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे.	१५ दिवस	८. शाखाधिकारी-पाटशाखा-कोळगाव शाखा, तालुका भडगाव, जिल्हा जळगाव. ९. शाखाधिकारी-पाटशाखा-पिंपरखेड शाखा, तालुका भडगाव, जिल्हा जळगाव. १०. शाखाधिकारी-पाटशाखा-गोंडगाव-१ शाखा, तालुका भडगाव, जिल्हा जळगाव. ११. शाखाधिकारी-पाटशाखा-गोंडगाव-२ शाखा, तालुका भडगाव, जिल्हा जळगाव. १२. शाखाधिकारी-पाटशाखा-भडगाव-शाखा, तालुका भडगाव, जिल्हा जळगाव.	उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, भडगाव, तालुका भडगाव, जिल्हा जळगाव. (अ.क्र. ८ ते १२).	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.
३	बिगरसिंचन पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे.	१५ दिवस	१३. शाखाधिकारी-पाटशाखा-कासोदा शाखा, तालुका एरंडोल, जिल्हा जळगाव. १४. शाखाधिकारी-पाटशाखा-नागदुली शाखा, तालुका एरंडोल, जिल्हा जळगाव. १५. शाखाधिकारी-पाटशाखा-तळई शाखा, तालुका एरंडोल, जिल्हा जळगाव. १६. शाखाधिकारी-पाटशाखा-पाळधी-१ शाखा, तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव. १७. शाखाधिकारी-पाटशाखा-पाळधी-२ शाखा, तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव.	उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, एरंडोल, तालुका एरंडोल, जिल्हा जळगाव. (अ.क्र. १३ ते १७).	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.
			१८. शाखाधिकारी-पाटशाखा-पिंप्री शाखा, तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव. १९. शाखाधिकारी-पाटशाखा-साळवा शाखा, तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव. २०. शाखाधिकारी-पाटशाखा-धरणगाव शाखा, तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव. २१. शाखाधिकारी-पाटशाखा-दहिवद शाखा, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव. २२. शाखाधिकारी-पाटशाखा-पातोंडा शाखा, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव.	उपविभागीय अभियंता पाटबंधारे उपविभाग, धरणगाव, तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव. (अ.क्र. १८ ते २२)	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.
४	पाणीपट्टी देयक तक्रार निवारण करणे.	१५ दिवस	२३. शाखाधिकारी-पाटशाखा-पारोळा-१ शाखा, तालुका पारोळा, जिल्हा जळगाव. २४. शाखाधिकारी-पाटशाखा-पारोळा-२ शाखा, तालुका पारोळा, जिल्हा जळगाव. २५. शाखाधिकारी-पाटशाखा-तामसवाडी शाखा, तालुका पारोळा, जिल्हा जळगाव. २६. शाखाधिकारी-पाटशाखा-जळगाव शाखा, तालुका-जिल्हा जळगाव.	उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव. (अ.क्र. २३ ते २६).	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.

अनुसूची — चालू

१	२	३	४	५	६
५	लाभक्षेत्राचा दाखला देणे.	१ महिना	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.
६	ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, कटक मंडळे (Cantoment Board) यांना घरगुती पाणीवापर परवाना देणे.	३ महिने	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.
७	महानगरपालिका, खाजगी विकसक, विशेष नगर विकास प्रकल्प यांना घरगुती/ औद्योगिक पाणीवापर परवाना देणे.	६ महिने	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.
८	औद्योगिक प्रयोजनासाठी पाणीवापर परवाना देणे.	६ महिने	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.
९	नदी व जलाशयापासून अंतराचा दाखला देणे.	१ महिना	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.
१०	उपसा सिंचन परवानगी देणे.	२ महिने	कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.	मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव, तालुका-जिल्हा जळगाव.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,

बाळासाहेब शंकरराव काथेपुरी,
कार्यकारी अभियंता,
गिरणा पाटबंधारे विभाग,
जळगाव.

जळगाव, ६ ऑक्टोबर २०१५.

GIRNA IRRIGATION DIVISION, JALGAON

Right to Public Services Ordinance, 2015

क्रमांक गिपावि/सिंचन/४८७१/२०१५.— In exercise of the powers conferred by sub-section *(1)* of Section 3 of the Maharashtra Right to Public Services Ordinance, 2015 (Mah.Ord.No.V of 2015), the Government of Maharashtra hereby, notify public services that are rendered by the Water Resources Department, alongwith the Designated Officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended herewith.

SCHEDULE

Sr. No.	Name of the Public Service	Time limit for providing service (working days)	Designated Officers	First Appellate Authority	Second Appellate Authority
1	2	3	4	5	6
1	To sanction admissible water entitlement to the Water Users Association.	15 days (After comm-encement of season).	1. Sectional Engineer-Irrigation Section-Girna Dam Section, taluka Nandgaon, district Nashik. 2. Sectional Engineer-Irrigation Section-Mehunbare, taluka Chalisgaon, district Jalgaon. 3. Sectional Engineer-Irrigation Section-Kalwadi, taluka Malegaon, district Nashik. 4. Sectional Engineer-Irrigation Section-Dahiwad, taluka Chalisgaon, district Jalgaon. 5. Sectional Engineer-Irrigation Section-Takli-1, taluka Chalisgaon, district Jalgaon. 6. Sectional Engineer-Irrigation Section-Takli-2, taluka Chalisgaon, district Jalgaon. 7. Sectional Engineer-Irrigation Section-M.I.Section, taluka Chalisgaon, district Jalgaon.	Assitant Engineer Gr. 1, Irrigation Sub-Dn., Chalisgaon taluka Chalisgaon, district Jalgaon. (Sr.No. 1 to 07).	Executive Engineer, Girna Irrigation Division Jalgaon. Tal-Dist-Jalgaon.
2	To issue Certificate of arrears of Water charges to the Water User Association	15 days	8. Sectional Engineer-Irrigation Section-Kolgaon, taluka Bhadgaon, district Jalgaon. 9. Sectional Engineer-Irrigation Section-Pimperkhed, taluka Bhadgaon, district Jalgaon. 10. Sectional Engineer-Irrigation Section-Gondagaon-1, taluka Bhadgaon, district Jalgaon. 11. Sectional Engineer-Irrigation Section-Gondagaon-2, taluka Bhadgaon, district Jalgaon. 12. Sectional Engineer-Irrigation Section-Bhadgaon, taluka Bhadgaon, district Jalgaon.	Sub-Divisional Officer, Irrigation Sub-Dn., Bhadgaon talukla Bhadgaon, district Jalgaon. (Sr.No. 08 to 12).	Executive Engineer, Girna Irrigation Division Jalgaon. Tal-Dist-Jalgaon.

SCHEDULE – *Contd.*

1	2	3	4	5	6
3	To issue Certificate of arrears of Non-Irrigation Water charges.	15 days	13. Sectional Engineer-Irrigation Section-Kasoda, taluka Erandol, district Jalgaon. 14. Sectional Engineer-Irrigation Section-Nagduli, taluka Erandol, district Jalgaon. 15. Sectional Engineer-Irrigation Section-Talai, taluka Erandol, district Jalgaon. 16. Sectional Engineer-Irrigation Section-Paldhi-1, taluka Dharangaon, district Jalgaon. 17. Sectional Engineer-Irrigation Section-Paldhi-2, taluka Dharangaon, district Jalgaon.	Sub-Divisional Officer, Irrigation Sub-Dn., Erandol, taluka Erandol, district Jalgaon. (Sr.No. 13 to 17).	Executive Engineer, Girna Irrigation Division, Jalgaon. Tal-Dist-Jalgaon.
			18. Sectional Engineer-Irrigation Section-Pimpri, taluka Dharangaon, district Jalgaon. 19. Sectional Engineer-Irrigation Section-Salwa, taluka Dharangaon, district Jalgaon. 20. Sectional Engineer-Irrigation Section-Dharangaon, taluka Dharangaon, district Jalgaon. 21. Sectional Engineer-Irrigation Section-Dahiwad, taluka Amalner, district Jalgaon. 22. Sectional Engineer-Irrigation Section-Patonda, taluka Amalner, district Jalgaon.	Sub-Divisional Officer, Irrigation Sub-Dn., Dharangaon, taluka Dharangaon, district Jalgaon. (Sr.No. 18 to 22).	Executive Engineer, Girna Irrigation Division, Jalgaon. Tal-Dist-Jalgaon.
4	To resolve grievances regarding Non-Irrigation Water charges.	15 days	23. Sectional Engineer-Irrigation Section-Parola-1, taluka Parola, district Jalgaon. 24. Sectional Engineer-Irrigation Section-Parola-2, taluka Parola, district Jalgaon. 25. Sectional Engineer-Irrigation Section-Tamaswadi, taluka Parola, district Jalgaon. 26. Sectional Engineer-Irrigation Section-Jalgaon, taluka-district Jalgaon.	Sub-Divisional Officer, Irrigation Sub-Dn., Jalgaon taluka-district Jalgaon. (Sr.No. 23 to 26).	Executive Engineer, Girna Irrigation Division, Jalgaon. Tal-Dist-Jalgaon.

SCHEDULE – *Contd.*

1	2	3	4	5	6
5	To issue command area Certificate	1 Month.	Executive Engineer, Girna Irrigation Division, Jalgaon, taluka-district Jalgaon	Superintending Engineer and Administrator, Command Area Development Authority, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Chief Engineer, Tapi Irrigation Development Corporation, Jalgaon, Tal-Dist. Jalgaon.
6	To issue Licence for the use of water for Domestic purpose to Gram Panchayat, Zilla Parishad, Nagar Parishad, Nagar Palika, Nagar Panchayat, Cantonment Board.	3 Months	Executive Engineer, Girna Irrigation Division, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Superintending Engineer and Administrator, Command Area Development Authority, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Chief Engineer, Tapi Irrigation Development Corporation, Jalgaon, Tal-Dist. Jalgaon
7	To issue Licence for the use of water for Domestic / Industrial purpose to Municipal Corporation, Private Developer, Special, Township Project.	6 Months	Executive Engineer, Girna Irrigation Division, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Superintending Engineer and Administrator, Command Area Development Authority, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Chief Engineer, Tapi Irrigation Development Corporation, Jalgaon, Tal-Dist. Jalgaon
8	To issue Licence for the use of water for Industrial purpose.	6 Months.	Executive Engineer, Girna Irrigation Division, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Superintending Engineer and Administrator, Command Area Development Authority, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Chief Engineer, Tapi Irrigation Development Corporation, Jalgaon, Tal-Dist. Jalgaon

SCHEDULE – *Contd.*

1	2	3	4	5	6
9	To issue distance Certificate from River and Reserviour.	1 Month	Executive Engineer, Girna Irrigation Division, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Superintending Engineer and Administrator, Command Area Development Authority, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Chief Engineer, Tapi Irrigation Development Corporation, Jalgaon, Tal-Dist. Jalgaon
10	To permission give for Lift Irrigation.	2 Months	Executive Engineer, Girna Irrigation Division, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Superintending Engineer and Administrator, Command Area Development Authority, Jalgaon, taluka-district Jalgaon.	Chief Engineer, Tapi Irrigation Development Corporation, Jalgaon, taluka-district Jalgaon.

By order and in the name of Governor of Maharashtra.

BALASAHEB SHANKARRAO KATHEPURI,
Executive Engineer,
Girna Irrigation Division,
Jalgaon.

Jalgaon, 6th October 2015.

जिल्हा उपनिबंधक यांजकडून

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३ अन्वये

क्रमांक पणन-१/कृउबास/नाशिक/शेतमालनियमन/कलम-३/८२९६/२०१५.– महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३ अन्वये कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक या बाजार समितीने तिच्या कार्यक्षेत्रात यापूर्वी नियमन करण्यात आलेल्या शेतमालाव्यतिरिक्त सोयाबीन या शेतमालाचे नियमन करण्याची विनंती या कार्यालयाकडे केलेली आहे.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३ अन्वयेचे अधिकार महाराष्ट्र शासन, कृषि व सहकार विभाग, अधिसूचना क्रमांक एपीएम-२०८१/३६३४०/४४०/११-स, दिनांक ५ सप्टेंबर १९८१ अन्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, सुनील बनसोडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक या बाजार समितीने तिच्या कार्यक्षेत्रात यापूर्वी नियमन करण्यात आलेल्या शेतमालाव्यतिरिक्त सोयाबीन या शेतमालाचे नियमन करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

उक्त प्रकरणी ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून ३० दिवसांचे आत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक, सहकार संकुल, सारडा सर्कल, नॅशनल उर्दू हायस्कूलजवळ, नाशिक यांचेकडे हरकती अगर सूचना पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या सूचना अगर हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

सुनील बनसोडे,
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक.

नाशिक, ७ ऑक्टोबर २०१५.

प्रभारी जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांजकडून

आदेश

क्रमांक कार्यव्य/रजा/१८०/२०१५.–श्री. एम. एच. शेख, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर यांची दिनांक २२ मे २०१५ ते दिनांक २९ मे २०१५ रोजीची एकूण आठ दिवसाची मंजूर करणेत आलेली अर्जित रजा याद्वारे रद्द करणेत येत आहे.

अहमदनगर, २२ मे २०१५.

आदेश

क्रमांक कार्यव्य/रजा/१८२/२०१५.– श्री. व्ही. ए. पाटील, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगाव यांची दिनांक २५ मे २०१५ ते ३० मे २०१५ रोजी एकूण सहा दिवसांची अर्जित रजा याद्वारे मंजूर करणेत येत आहे. तसेच दिनांक २२ मे २०१५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक १ जून २०१५ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. व्ही. ए. पाटील यांना दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगाव या पदावर पुनर्नियुक्त करण्यात येत आहे, तसेच त्यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगाव यापदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. व्ही. ए. पाटील, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगाव यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा न्यायीक कार्यभार दिनांक २२ मे २०१५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक २४ मे २०१५ रोजीपर्यंत श्रीमती व्ही. बी. पारगावकर, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, श्रीरामपूर यांचेकडे व दिनांक २५ मे २०१५ रोजीपासून ते दिनांक १ जून २०१५ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत श्री. बी. जी. धर्माधिकारी, सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, श्रीरामपूर यांचेकडे व प्रशासकिय कार्यभार श्री. एस. ए. बाफना, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कोपरगाव यांचेकडे ठेवणेत येत आहे.

श्री. व्ही. ए. पाटील, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगाव हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, कोपरगाव यापदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

सु. कि. केवले,
प्रभारी जिल्हा न्यायाधीश-१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
अहमदनगर.

अहमदनगर, २१ मे २०१५.

आदेश

क्रमांक कार्यव्य/रजा/१२०/२०१५.–श्रीमती रि. न. मर्क, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, संगमनेर यांची दिनांक ६ एप्रिल २०१५ ते दिनांक ८ एप्रिल २०१५ रोजी एकूण तीन दिवसांची अर्जित रजा याद्वारे कार्योत्तर मंजूर करणेत येत आहे. तसेच दिनांक ६ एप्रिल २०१५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक ९ एप्रिल २०१५ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्रीमती रि. न. मर्क यांना सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, संगमनेर या पदावर पुनर्नियुक्त करण्यात येत आहे, तसेच त्यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, संगमनेर यापदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्रीमती रि. न. मर्क, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, संगमनेर यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती व्ही. जे. कोरे, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, संगमनेर यांचेकडे ठेवणेत येत आहे.

श्रीमती रि. न. मर्क, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, संगमनेर हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, अहमदनगर यापदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

अ. दे. तनखीवाले,
प्रभारी जिल्हा न्यायाधीश-१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहमदनगर.

अहमदनगर, २५ मे २०१५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006. EDITOR : SHRI RUPENDRA DINESH MORE.